# एरिक फ्रॉम प्रणित मार्क्सची मानव संकल्पना: एक अवलोकन

सहाय्यक प्रा. डॉ. प्रमोद जी. शिंदे
दयानंद विधी महाविद्यालय ,लातूर

**गोषवारा (Abstract):**

*प्रस्तुत लेखात नवमार्क्सवादी विचारवंत एरिक फ्रॉम प्रणित मार्क्सच्या मानव संकल्पनेचे एक सैद्धांतिक अवलोकन करण्यात आलेले आहे. एरिक फ्रॉम दुरुस्तीवादी संकल्पना आणि मानवी स्वभावाची संकल्पना याचे विवेचन केलेले आहे.*

## प्रास्ताविक

एरिक फ्रॉम या नऊ मार्क्सवादी विचारवंताने १९६१ मध्ये 'Marx's Concept of Man' या ग्रंथाचे लेखन केले होते. या लेखात मार्क्स मानवतावादी, तत्त्वज्ञानात्मक विचाराचा पारंपारिक मार्क्सवादी म्हणजेच सोवियत मार्क्सवादी विचार जगतातील बौद्धिक साहित्यावर हा लेख आधारित आहे. लोकप्रिय जर्मन मार्क्सवादी विचारवंत एरिक फार्मनी "Economic and Philosophical Manuscripts" आणि त्याचबरोबर "The German Ideology" यातील मार्क्सच्या मानवतावादी तत्त्वविचारावर भर दिला. त्यामध्ये प्रामुख्याने परात्मभाव, स्वातंत्र्य आणि मार्क्सची निर्मितीक्षमता या संकल्पनेवर लक्ष केंद्रित केले आहे. या संकल्पनेचा वापर कार्ल मार्क्सने आपल्या विचारात केलेला होता .त्यामुळे मार्क्स हा मानवतावादी विचारवंत आहे ,असे त्यांनी आपली मत व्यक्त केले आहे.

फ्रॉम यांच्या मते, मानवाची मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून आर्थिक प्राप्ती ,सुख -समाधान ही मुख्य प्रेरणा आहे. त्याउलट सोवियत मार्क्सवादी विचारात या मुख्य प्रेरणेकडे दुर्लक्ष केले आहे .ती एक प्रकारे मार्क्स विचाराची प्रांत जाणीव आहे. मार्क्सच्या विचाराचे ध्येय हे आध्यात्मिक मानव मुक्ती, आर्थिक नियतीवादी श्रृंखलेतून मुक्ती, मानवी विचाराची सर्वव्यापकता या सर्वांची एकता व सुसंगता मानवी स्वभावाची करण्याची होते. बार्शी तत्त्वज्ञान हे धर्मनिरपेक्ष अलंकृत भाषेचा अभाव अशा स्वरूपाचे होते .फ्रॉमचे ध्येय हे मार्क्सचे उद्दिष्ट आणि समाजवादाची दृष्टी यावर चर्चा करणे हे होते.

एरिक फ्रॉम च्या मते, जगभरात मार्क्सवादी चिंतन हे चुकीच्या दृष्टीने व संदर्भाने केले गेले आहे. फ्रॉमच्या अभ्यासातून मार्क्स हा सामाजिक आणि मानवतावादी शास्त्रज्ञ होता हे जाणवते. मार्क्सचे वास्तविक ध्येय हे माणसाला परात्मभावातून मुक्त करणे आणि व्यक्तीने स्वतःच्या जीवनाकडे आदराने ,स्वातंत्र्ययुक्त असे बघितले पाहिजे ,असे मत फ्रॉम यांनी व्यक्त केले. फ्रॉम यांनी दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे की, कशाप्रकारे 19 व्या शतकातील मूळ मार्क्सचा विचार पूर्व युरोपियन देशांनी लपविण्याचा प्रयत्न केला आहे. मुळात मार्क्सचा विचार हा मानवी जीवनाच्या रास्त ध्येयावर आधारित आहे. केवळ मानवी घडामोडी मागे आर्थिकच प्रेरणा नसतात तर ,स्वतःची जाणीव ही देखील असते. त्यामुळे मार्क्सच्या विचाराचा चुकीचा प्रचार व प्रसार केला आहे आणि मार्क्स केवळच भौतिकवादी विचार करत नसून तो देखील मानवी सन्मानासाठी आपल्या विचारातून जगत होता हे

दाखविण्याचा प्रयत्न एरिक फ्रॉम यांनी केला आहे. अशारीतीने फ्रॉम यांनी अमेरिकन लोकांचे मार्क्सच्या लिखाणाकडे लक्ष वेधण्याचे कार्य या ग्रंथाच्या प्रकाशनातून केले गेले आहे.

एरिक फ्रॉम यांची मार्क्सची मानव संकल्पनेची 90 पानी चर्चा यात केलेली आहे. टॉम बॉटमर यांनी ११० पानी मार्क्सच्या १८४४ च्या निबंधाचे भाषांतर केले आहे. फ्रॉम यांच्या अगोदर एच. मार्क्युज यांनी आपल्या 'Reason and Revolution' (१८४१) या ग्रंथात मार्क्सचां मानवतावादी दृष्टिकोनातून अभ्यास केलेला होता. त्यानंतर मार्क्सच्या Manuscript, १८४४ चे संपूर्ण भाषांतर १९५९ मध्ये मास्कोतील प्रोग्रेस पब्लिशर्स यांनी केले आहे. फ्रॉम यांनी मार्क्सला कशा रीतीने पूर्ण भौतिकवाद आहे, जे व्यक्तीवादी विचाराच्या महत्त्वाला दुर्लक्ष केले आहे असे लिखाण केले गेले आहे.

फ्रॉम यांनी कशारीतीने मार्क्सच्या विचाराबद्दल पश्चिमेकडील तत्त्वज्ञान आणि स्टॅलिनवादी विचारप्रणाली यांनी मार्क्सच्या विचारात मोडतोड करून सोवियत युनियन मधील एकपक्षीय -सर्वंकषवादी राजवटीत आणि माओवादी चीन या व्यवस्थेत मार्क्सच्या संदर्भात चुकीचा विचार केला आहे. शीतयुद्धाच्या कालखंडात कशाप्रकारे डावे तत्वज्ञ यांनी पश्चिमेकडील साम्यवादी विचाराकडे झुकले आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न केला गेला आहे. उदाहरणार्थ सिडनी हुक ,जिन पाल सात्र. फ्रॉम यांनी कुशाग्रतेने एका बाजूला 'मार्क्सवादी मानवतावादी समाजवाद' आणि दुसऱ्या बाजूला 'सर्वंकषवादी समाजवाद' यामध्ये फरक केला आहे. फ्रॉम यांनी अमेरिकेच्या आण्विक शस्त्र धोरणावर देखील टीका केली आहे. (फ्रॉम यांची' May Man Prevail' ही आण्विक शास्त्रावरील टीका) यातून फ्रॉम यांना मूलग्राही मानवतावादी विचारवंत म्हणून ओळखले जाते. पुढे Economic Manuscripts वरील लिखाणाबाबत रिचर्ड बर्नस्टाईन या तत्त्वज्ञाने समीक्षा केली आहे. फ्रॉम यांचा मानवाची "स्वजाणीव" ही संकल्पना "निरंकुश मानवतावादीचा" एक प्रकार आहे, असे आपले मत बर्नस्टाईने व्यक्त केले होते.

एरिक फ्रॉम यांच्या मते भांडवलशाहीतील उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या 'गरजा' या कृत्रिम नी खोट्या असतात. भांडवलशाहीतील मानसशास्त्राला या गरजांचे चिकित्सक विश्लेषण करावेसे वाटत नाही. म्हणूनच मार्क्सने भांडवलशाही व्यवस्थेतील कृत्रिम ,अमानुष व गुलाम बनविणाऱ्या गरजांवर बोट ठेवले आहे. एखादी वस्तू हवीशी वाटण्याची रूपांतर काल व आजही बाजारपेठेत केले जाते हे लक्षात घेतले तर 'वाटणे' व 'गरज'असणे यातील अंतर सहज लक्षात येते. यातूनच मानवावर वस्तूंचे व कृत्रिम गरजांचे स्वामित्व प्रस्थापित होते व काल्पनिक सुखाच्या मागे माणसे लागतात. मार्क्सने संपन्न मानवी गरजांची संकल्पना मांडून संपूर्ण मानवी व्यक्तिमत्त्वाची संकल्पनेचा विचार केला होता.

फ्रॉमच्या मते, मार्क्सच्या भौतिकवादी आणि ऐतिहासिक भौतिकवादी संकल्पनेचा गैरअर्थ लावला आहे. मार्चने भौतिकवादी संकल्पने द्वारे मानवाची मुख्य प्रेरणा ही भौतिक सुखंतू ही होती, त्यामुळे त्याच्या व्यवहाराच्या पाठीमागे भौतिक गोष्टींची पूर्तता ही असते, असा विचार प्रगट करण्यातून मार्क्सने भौतिकवादी विचारास नैतिक मूल्यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्याने प्लेटोच्या 'आदर्शवादी' व्यवस्थेचा देखील दाखला दिला आहे. हेच त्याची तत्त्वज्ञानात्मक विचार तर मार्क्सचे भौतिकवादी विचार त्यामुळे मार्क्सने आदर्शवादी विचार विरुद्ध भूमिका घेतली आहे. मार्क्सने कधीच ऐतिहासिक भौतिक वाद किंवा द्वंद्वात्मक भौतिकवाद याबद्दल बोलले नाही ,त्यांनी स्वतःची द्वंद्वात्मक पद्धतीचा वापर केला आणि हेगेलपेक्षा आपली भूमिका वेगळी मांडली आहे.

**एरिक फ्रॉम व दुरुस्तीवाद संकल्पना:**

फ्रॉम यांनी मार्क्सवादातील मूलभूत संकल्पनांचे चिकित्सक मूल्यमापन करून त्यामध्ये महत्त्वाचे पुन:बदल सुचविले आहेत. यालाच आपण दुरुस्तीवादी संकल्पना देखील म्हणून ओळखतो. मूळतः बर्नस्टिनच्या

अभ्यासातून ही संज्ञा रूढ झाली आहे. यानुसार मार्क्सवादातील क्रांतीचे महत्त्व व कामगारवर्गाची हुकूमशाही या दोन महत्त्वाच्या संकल्पना नाकारल्या गेलेल्या आहेत. त्यांच्या मते भांडवली लोकशाहीचे समाजवादी समाजात बदल होण्यासाठी व उत्पादन साधनांचे सामाजीकरण होण्यासाठी क्रांतीची आवश्यकता नाही.

उत्पादन संबंध व संपत्तीची मालकी रचना परिवर्तित करणे या गोष्टी भांडवलशाहीत अस्तित्वात असलेल्या संस्थांच्या वापरातूनच टप्याटप्याने करता येऊ शकतात. कायद्याचे महत्त्व अधोरेखित करून शांततामय सह अस्तित्वाच्या माध्यमातून समाजवादी समाज स्थापित करता येऊ शकतो असा विचार फ्रॉम यांनी मांडला आहे. त्यामुळेच मार्च वादी विचारातील मूलभूत प्रमेय नाकारून त्यात दुरुस्ती करण्याचा मार्ग सामान्यपणे सामाजिक लोकशाही ,वर्ग समन्वयाची भूमिका ,साम्यवादी पक्षाच्या नेतृत्वास विरोध ,आदी भूमिका दुरुस्ती संकल्पनेने घेतलेल्या आहेत.

**एरिक फ्रॉम प्रणित मानवी स्वभावाचे विश्लेषण:**

फ्रॉम यांनी मनोविश्लेषणात्मक दृष्टीने मानवी स्वभाववाचे विवेचन केले आहे. त्यांनी मार्क्सच्या "भांडवल- भाग एक" मधील महत्त्वाचे तत्व सांगितले आहे. ते पुढील प्रमाणे आहेत सामान्यतः मानवी स्वभावाचा संबंध हा उपयुक्ततातेशी आहे. त्यातूनच मानवी स्वभाव हा इतिहासाचा प्रत्येक कालखंड बदलण्यास सहाय्यभूत ठरतो अशाप्रकारे फ्रॉम यांनी 'सामान्य मानवी स्वभाव' आणि 'परिवर्तनीय मानवी स्वभाव 'असे वर्गीकरण केले आहे. पुढे ते सांगतात की ,इतिहास हा मानवी स्व जाणिवेचा इतिहास आहे, इतिहासाची निर्मिती ही मानवनिर्मित नसून किंवा त्याच्या श्रम व उत्पादनातून निर्मित नाही ,तर ती मानवाच्या स्व जाणिवेतून निर्मित आहे. मानवात काही अंगभूत मूलतत्व असतात ,तेच द्वंद्वात्मक प्रक्रियेत निर्धारित होत असतात. त्यामुळे मानव हाच त्याच्या जीवनाचा करा शिल्पकार म्हणून ओळखला जातो त्यातूनच त्याचे व्यवहार हे निर्धारित होत असतात .अशा प्रकारे फ्रॉम यांनी मार्क्सची मानवी संकल्पनेचे मूळ हेगेलवादी तत्वज्ञानात सांगितले गेले आहे.

फ्रॉम यांनी उपजत मानवी स्वभावासंदर्भात आत्मनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ घटकातील संबंध स्थापित करण्यावर भर दिला आहे. त्यामुळे त्यांच्या समन्वयातून मानवतावादी विचाराचे बीजे आपणास दिसतात. मानवी स्वभावाचे वास्तविक स्वरूप समजावून घेण्यासाठी मार्क्सच्या साम्यवादी ध्येयाचा दाखला दिला आहे. त्यांच्यामध्ये मार्क्सच्या साम्यवादाची ध्येय आहे समाजातील खाजगी मालमत्ता नष्ट करणे हे आहे. याचा संबंध त्यांनी मानवाच्या स्व व्यवहाराशी लावलेला आहे. आमच्या मते मार्क्स या समाजवादाचे मुख्य ध्येय हे मानव मुक्ती हे उत्पादन प्रक्रियेच्या संदर्भातील स्व जाणीव, यातूनच व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करणे आहे.

**मूल्यमापन :**

फ्रॉमचा मतानुसार, मानवी स्वभावाचा विचार हा समानतेच्या प्रमेयाशी निगडित आहे. खऱ्या अर्थाने मार्क्सच्या विचारातील मूळ मानवी स्वभावाविषयी सोवियत मार्क्सवादी विचाराने "मिथ्या जाणिवा" निर्माण केल्या आहेत. त्यामुळे आपण त्यात संशोधित विचार निर्माण करणे आवश्यक आहे. त्यातूनच फ्रॉम यांनी कामाचा विस्तार, वेतनातील समानता, तसेच प्राथमिकरणाच्या विचारात अर्थहीन श्रमाचे उत्पादित, मुक्त श्रम, श्रमाच्या मोबदल्यात योग्य वेतन कसे दिले जाईल या मार्क्सच्या विचारांचा फ्रॉम यांनी येथे दाखला घेतला आहे. 'दि क्रायसिस ऑफ सायको एनालिसिस' या ग्रंथात फ्रॉम यांनी मार्क्सच्या मानवी स्वभाव विषयक संकल्पनेचे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून स्पष्टीकरण केले आहे. पुढे त्यांनी मार्क्सच्या मानव विचारात परात्मभाव ,समाजवाद , मार्क्सच्या विचारातील सातत्य, मार्क्स एक युगपुरुष या लेखातून विचार प्रकट केले आहे. फ्रॉम यांनी परात्मभाव संकल्पनेत मार्क्सची तुलना

कांट यांच्या व्यक्तिवादी विचाराशी केली आहे. तसेच खाजगी संपत्तीचा नायनाट ,मनुष्याची होणारे यांत्रिकीकरण, मानवास त्याच्या श्रमाचा योग्य मोबदला न मिळणे आधी विचारांचा आढावा घेतला आहे.

अशाप्रकारे मानवी स्वभाव व समाज यातील अंतर आहे याची चर्चा प्रस्तुत लेखात केली आहे. फ्रॉम यांनी मानवतावादी दृष्टिकोनातून मार्क्सच्या विचाराचा आढावा घेतला आहे. खरा मार्क्सवादी विचार जगासमोर आलेला नाही ,अशी खंत त्यांनी व्यक्त केलेली आहे. शेवटी आपणास असे म्हणावे लागेल की एक फ्रॉम सारख्या नव मार्क्सवादी अभ्यासकाने नवीन व जुना मार्क्सवादी विचारात सन्मानवादी भूमिका घेतलेली दिसते. संपूर्ण मार्क्सवादी विचार हा आधुनिक राजकीय विचाराची ज्ञान कक्षा विस्तारण्याचा प्रयत्न त्यातून झालेला दिसतो.

**संदर्भ:**

१. फ्रॉम एरिक, २००४, मार्क्स कॉन्सेप्ट ऑफ मॅन, कॉन्टिनम, लंडन.
२. चौसाळकर अशोक, २०१०, 'मार्क्सवाद -उत्तर मार्क्सवाद', प्रतिमा प्रकाशन, पुणे.
३. पळशीकर सुहास ,राजेंद्र होरा, राज्यशास्त्र कोश, मानवतावाद ,दास्ताने प्रकाशन ,पुणे.
४. मोरे सदानंद, फेब्रु. १९८४, मानव आणि मार्क्स ,पुस्तक परीक्षण ,परामर्श खंड ५, अंक ४.
५. https://en.m.wikipedia.org/wiki/Erich_Fromm